**मे. दिनानाथ अलाईड स्टील प्रा. लि., बी-३/१, एम.आय.डी.सी, मुल, जि. चंद्रपूर यांनी त्यांच्या प्रस्तावित ६,००,००० टन/वर्ष(०.६ दशलक्ष टन/वर्ष) क्षमतेचा आयर्न ओर बेनिफिकेशन संयंत्र व ४,००,००० टन/वर्ष(०.४ दशलक्ष टन/वर्ष) क्षमतेचा आयर्न ओर पॅलेट प्लांट उभारणीच्या प्रस्तावाबाबत पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी म.प्र.नि. मंडळ, चंद्रपूर व जिल्हाधिकारी कार्यालय चंद्रपूर यांच्या संयुक्त विद्यमाने घेण्यात आली.**

| | | |
|---|---|---|
| **दिनांक** | **:** | **३०/११/२०२१** |
| **वेळ** | **:** | **दुपारी ११.३० वाजता** |
| **स्थळ** | **:** | **प्रकल्प स्थळ, मे. दिनानाथ अलाईड स्टील प्रा. लि., बी-३/१, एम.आय.डी.सी, मुल, जि. चंद्रपुर** |

**<u>प्रस्तावना:-</u>**

मे. दिनानाथ अलाईड स्टील प्रा. लि., बी-३/१, एम.आय.डी.सी, मुल, जि. चंद्रपूर यांनी त्यांच्या प्रस्तावित ६,००,००० टन/वर्ष(०.६ दशलक्ष टन/वर्ष) क्षमतेचा आयर्न ओर बेनिफिकेशन संयंत्र व ४,००,००० टन/वर्ष(०.४ दशलक्ष टन/वर्ष) क्षमतेचा आयर्न ओर पॅलेट प्लांट करिता प्रकल्पधारकाने पर्यावरणीय मंजूरीकरिता पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांना अर्ज सादर केला. पर्यावरण आघात मुल्यांकन अधिनियम २००६ च्या तरतुदीप्रमाणे पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालासोबत जाहीर जनसुनावणीमध्ये उपस्थित झालेले मुद्दे व त्याबाबत प्रकल्पधारकाने दिलेली उत्तरे यांचा सामावेश करून नवीन पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल सादर करण्याचे निर्देश सदर विभागाने दिले.

प्रकल्प व्यवस्थापनाने पर्यावरण विषयक जनसुनावणीसाठी महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाकडे उपरोक्त प्रकल्पाकरीता अर्ज केल्यावर मप्रनि मंडळ, चंद्रपूर व जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांच्या समन्वयाने दि. ३०/११/२०२१ ही तारीख निश्चित करण्यात आली. पर्यावरण आघात मुल्यांकन अधिनियम २००६ मध्ये नमुद केलेल्या तरतुदी प्रमाणे सदर जनसुनावणीची जाहीर सुचना, मप्रनि मंडळाने दि. २७/१०/२०२१ रोजीच्या मराठी दैनिक "लोकमत" व इंग्रजी दैनिक "द टाईम्स ऑफ इंडिया" या वृत्तपत्रांमध्ये प्रसिध्द केली. वृत्तपत्रातील जाहीर सुचनेच्या जाहिरातीद्वारे सर्व संबंधित व्यक्तींना त्यांच्या सुचना, टीका-टिप्पणी, विचार, आक्षेप इत्यादी या कार्यालयाकडे नोंदविण्याबाबत आवाहन करण्यात आले होते.

या प्रकल्पाबाबत प्रकल्पाचा पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल व कार्यकारी सारांशाची इंग्रजी व मराठी प्रत खालील कार्यालयात नागरीकांच्या अवलोकनाकरीता/ संबंधितांच्या अभ्यासासाठी उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या.

१. पर्यावरण विभाग, १५ वा मजला, नवीन प्रशासकिय भवन, महाराष्ट्र शासन मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
२. सह-संचालक (जल प्रदूषण नियंत्रण), महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कल्पतरु पाईंट, २ रा व ४ था माळा, सिनेप्लानेट सिनेमा समोर, सायन सर्कल जवळ (पु) मुंबई - ४०० ०२२
३. प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, उद्योग भवन, पहिला माळा, रेल्वे स्टेशन रोड, चंद्रपूर.
४. उप-प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, उद्योग भवन, पहिला माळा, रेल्वे स्टेशन रोड, चंद्रपूर.
५. जिल्हाधिकारी कार्यालय, चंद्रपूर.
६. जिल्हा परिषद, चंद्रपूर.
७. जिल्हा उद्योग केंद्र, चंद्रपूर.
८. उप-विभागीय कार्यालय, मुल, ता. मुल, जि. चंद्रपूर.
९. तहसिल कार्यालय, मुल, ता. मुल, जि. चंद्रपूर.
१०. पंचायत समिती कार्यालय, मुल, ता. मुल, जि. चंद्रपूर.
११. नगर परिषद, मुल, ता. मुल, जि. चंद्रपूर.
१२. ग्रामपंचायत कार्यालय चितेगाव, ता. मुल, जि. चंद्रपूर.
१३. ग्रामपंचायत कार्यालय मरेगाव, ता. मुल, जि. चंद्रपूर.
१४. ग्रामपंचायत कार्यालय चिमढा, ता. मुल, जि. चंद्रपूर.
१५. ग्रामपंचायत कार्यालय टेकाडी, ता. मुल. जि. चंद्रपूर.
१६. ग्रामपंचायत कार्यालय आकापूर, ता. मुल. जि. चंद्रपूर.

वरील अनुक्रमांक ५ ते १६ वर नमूद शासनाच्या विभागांनादेखील त्यांनी त्यांच्या स्तरावर या जनसुनावणीबाबत व्यापक प्रसिद्धी देण्याबाबत कळविण्यात आले होते. तसेच जाहीर जनसुनावणी बाबत अधिसूचनेमध्ये नमुद केलेल्या पध्दतीचा अवलंब करुन व्यापक स्वरूपात प्रसिध्दी देण्यात आली जेणेकरुन प्रकल्पामुळे बाधित अथवा संबंधित व्यक्तीना त्यांचे आक्षेप, टिका टिप्पणी, विचार अथवा सुचना संबंधित नियामक प्राधिकरणास नोंदविणे सोईचे होईल.

पर्यावरण वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार यांच्या दि. १४/०९/२००६ च्या पर्यावरण आघात मुल्यांकनअधिसूचने नुसार महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने सदर जाहीर जनसुनावणी घेण्यासाठी खालीलप्रमाणे समिती गठीत केली.

१) श्री. विशालकुमार मेश्राम, - **अध्यक्ष,**
अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी, चंद्रपूर

२) श्री. अ. मा. करे, - **सदस्य**
प्रादेशिक अधिकारी,
म.प्र.नि. मंडळ, चंद्रपूर

३) श्री. उमाशंकर भ. भादुले, - **समन्वयक**
उप-प्रादेशिक अधिकारी,
म.प्र.नि. मंडळ, चंद्रपूर

सदर प्रकल्पाबाबत प्राप्त झालेल्या तक्रारी, आक्षेप, निवेदन, प्रश्न व जनसुनावणी दरम्यान एकूण उपस्थितांचे हजेरीपट तसेच महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने सदर जाहीर जनसुनावणी घेण्यासाठी गठीत केलेल्या समितीचा आदेश अनुक्रमे सहपत्र-२ व ३ प्रमाणे सोबत जोडलेले आहे.

**<u>जनसुनावणीचे इतिवृत्तः-</u>**

जनसुनावणीच्या सुरुवातीस समन्वयक तथा उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, चंद्रपूर यांनी अध्यक्ष व उपस्थित अभ्यगतांचे स्वागत करुन जनसुनावणीच्या कार्यपध्दतीबद्दल माहीती दिली. त्यांनी उपस्थितांना पर्यावरण विषयक सुचना,विचार,आक्षेप इत्यादी घेऊन पुढे यावे अशी विनंती केली. तसेच त्यांनी हि सुनावणी सर्व संबंधित लोकांसाठी आयोजीत केलेली आहे जेणेकरुन त्यांचे पर्यावरण विषयक प्रश्न/शंकाचे निरसन करण्यात येईल असे सांगितले. तद्नंतर त्यांनी जनसुनावणी समितीचे अध्यक्ष यांना जनसुनावणीची कार्यवाही सुरु करण्याबाबत विनंती केली.

जनसुनावणी समितीचे अध्यक्ष तथा अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी, चंद्रपूर. यांनी उपस्थित जनसमुदायास मे. दिनानाथ अलाईड स्टील प्रा. लि., बी-३/१, एम.आय.डी.सी, मुल, जि. चंद्रपूर यांनी त्यांच्या प्रस्तावित ६,००,००० टन/वर्ष(०.६ दशलक्ष टन/वर्ष) क्षमतेचा आयर्न ओर बेनिफिकेशन संयंत्र व ४,००,००० टन/वर्ष(०.४ दशलक्ष टन/वर्ष) क्षमतेचा आयर्न ओर पॅलेट प्लांटच्या पर्यावरणविषयक प्रस्तावाबाबत आपल्या सुचना, विचार,आक्षेप घेऊन पुढे यावे अथवा त्या लेखी स्वरुपात मांडाव्यात, आपण व्यक्त केलेले मत तसेच सुचना व आक्षेप या अधिसूचनेत नमुद केलेल्या तरतुदीप्रमाणे पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांना कळविण्यात येतील, सदर सुनावणीचे छायाचित्रीकरण व व्हिडीओ शुटींग म.प्र.नि.मंडळाकडुन कायद्यातील तरतुदी प्रमाणे करण्यात येत आहे. तसेच प्रत्येकाने आपले प्रश्न विचारण्यापुर्वी आपले नाव व पत्ता सांगावा जेणे करुन सुनावणीच्या इतिवृत्तांत बनविते वेळी नमुद करण्यात येतील. त्यानंतर त्यांनी प्रकल्प प्रवर्तकांना प्रस्तावित प्रकल्पाबाबतची माहीती उपस्थितांना देण्यात यावी तसेच त्यांनी प्रकल्पाबाबत उपस्थित केलेल्या प्रश्नांचे शंकानिरसन करावे अशी सुचना केली.

तद्नंतर प्रकल्पधारकाच्या वतीने डॉ. प्रदिप टिपलटकर, पर्यावरण सल्लागार यांनी सदर प्रस्तावित प्रकल्पांबाबत पर्यावरण विषयक केलेला अहवाल मराठी भाषेत सादर केला. सादरीकरणात प्रामुख्याने प्रकल्पाबाबत खालील बाबी स्पष्ट करण्यात आल्या.

- प्रकल्पाबाबतची सविस्तर माहीती
- प्रकल्पाचे क्षेत्रफळ, सिमा, अक्षाश-रेखांश, नकाशा, बुडीत क्षेत्र, लाभ क्षेत्र, वन क्षेत्र, प्रकल्पाचे वैशिष्टय, प्रकल्पाचे महत्व, परिणाम, जमिन वापर, भुकंप स्थिरता
- प्रकल्पाचा उद्देश, सामाजिक स्थिती, रोजगाराची संधी, शेतकऱ्यांचा प्रकल्पामुळे होणारा विकास
- प्रकल्पाचे विश्लेषण, सारांश, निष्कर्ष
- सामाजिक व आर्थिक स्थितीचे विश्लेषन
- हवा,पाणी,जमिन,ध्वनी,विस्थापन इत्यादी बाबतची माहीती.
- नियोजीत प्रकल्पामुळे हवा, पाणी, विस्थापन, जैवविविधता यावर होणारे परिणाम व्यवस्थापन.
- प्रकल्प चालु झाल्यानंतर केले जाणारे पर्यावरण व्यवस्थापन याबाबतची माहीती.
- इतर पर्यावरण व्यवस्थापन विषयीची माहीती.

प्रकल्पधारकाने पर्यावरण विषयीची सविस्तर माहीती दिल्यानंतर सुनावणीचे समन्वयक यांनी असे आवाहन केले की, यानंतर आक्षेप/सुचना/प्रश्न व उत्तरे घेतले जातील. आपणांस विनंती की, सदर प्रकल्पाच्या पर्यावरण विषयक प्रश्न विचारावेत व त्यांचे समर्पक उत्तर प्रकल्प धारकाने द्यावे.

**जनसुनावणी दरम्यान चर्चेतील प्रश्न, टीका, टिप्पणी, आक्षेप, सुचना तसेच प्रकल्प धारकाने दिलेली उत्तरे/आश्वासने खालील प्रमाणे आहेत:**

**१) <u>श्री. संदिप करमवार माजी सरपंच:-</u>**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | १) हा प्रकल्प काय आहे हे सांगावे. प्रोडक्ट काय आहे? | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, आयर्न ओर चे बेनिफिकेशन करण्यात येईल. आयर्न ओर ला धुवून Pellet तयार करण्यात येतील. या मध्ये ६,००,००० टन/वर्ष(०.६ दशलक्ष टन/वर्ष) क्षमतेचा आयर्न ओर बेनिफिकेशन संयंत्र व ४,००,००० टन/वर्ष(०.४ दशलक्ष टन/वर्ष) क्षमतेचा आयर्न ओर पॅलेट प्लांट लावण्यात येणार आहे. |

| | | |
|---|---|---|
| | २) यातुन जे काही धूळ, पाणी, आवाज निघणार त्याचा लोकांना त्रास होवू नये या साठी काय Plan आहे. | धुळीचे उत्सर्जन रोकण्यासाठी ESP हे प्रदुषण नियंत्रण संयंत्र व ५५ मी. उंचीची चिमणी लावण्यात येणार आहे. यामुळे वायु प्रदुषणाचे प्रमाण नगण्य राहील. |
| | ३) नगण्य नसणार काही प्रमाणात राहील. | महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाने ठरवलेल्या मर्यादेपेक्षा कमी राहील. |
| | ४) या उद्योगाचे आम्ही स्वागत करु, परंतु स्थानिक मुजुरांच्या प्रश्ना बाबत आपले काय नियोजन आहे? मग ते कुशल असो की अकुशल असो त्यांना रोजगार देणार का? | १४० स्थानिक लोकांना या उद्योगात रोजगार देण्यात येईल या मध्ये कुशल व अकुशल व्यक्तींचा समावेश राहील. |
| | ५) असे म्हटले जाते परंतु असे होत नाही. लोकांच्या समस्येवर आम्ही लोकांच्या बाजूने उभे राहू आणि न्याय मागु. "आकाश" च्या पायाची इजा दाखविली. या MIDC तील इतर उद्योगांमुळे त्रास होतो. लोकांना गावात राहता येत नाही. समस्या सुटल्या नाही तर प्रकल्प होऊ देणार नाही. | १४० स्थानिक लोकांना या उद्योगात रोजगार देण्यात येईल या मध्ये कुशल व अकुशल व्यक्तींचा समावेश राहील.<br>या उद्योगाव्दारे कामगारांच्या सुरक्षेसाठी आवश्यक ते सर्व करण्यात येईल.<br>समन्वयक, पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, मुल एम.आय.डी.सी. क्षेत्रातील उद्योगांवर म.प्र.नि. मंडळाव्दारे योग्य ती कारवाई करण्यात येईल. |
| | ६) पर्यावरणाच्या सुरक्षेसाठी काय प्रयत्न करणार? यासाठी कीती खर्च करणार? | एकूण १८० लक्ष रुपये खर्च करण्याचे प्रस्तवित आहे. हा खर्च आरोग्य विषयक कामाकरीता, रस्ते बांधण्याकरीता ,शाळा बांधण्याकरीता प्रस्तावित आहे.<br>समन्वयक यांनी सांगितले की, सदर उद्योगास नियमाच्या अधिन राहून मप्रनि मंडळाव्दारे अटी व शर्ती युक्त C२E संमतीपत्र देण्यात येईल. तसेच नियमाच्या अधिन राहून व प्रदुषण नियंत्रण उपकरण/यंत्रणा उद्योगाने बसविल्यानंतर |

| | | |
|---|---|---|
| | | मंडळाव्दारे अटी व शर्ती युक्त C२O संमतीपत्र देण्यात येईल. तसेच मप्रनि मंडळाच्या अधिकाऱ्यांव्दारे उद्योगांची नियमित पणे पाहणी करण्यात येते, सांडपाणी व हवेचे नमुने घेण्यात येतात. आढळून आलेल्या त्रुटिंच्या आधारे नियमाप्रमाणे कारवाई करण्यात येते. |

२) <u>श्री. व्ही. सुनंद रेड्डी पर्यावरणवादी:-</u>

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | मी भारतातील प्रथम पर्यावरणवादी आहे जो औद्योगिकरणाच्या पक्षात आहे. ३५ वर्षाचा अनुभव पर्यावरणात आहे. दरवर्षी भारतात १ कोटी लोकं नोकरीत येतात. केवळ ५ लाख लोकांना सरकारी नोक-या मिळतात. ३५ लाख लोकांना खाजगी क्षेत्रात नोकरी मिळते. माझ्या मते unemployment हे समाजातील मोठे pollution आहे. मी उद्योगाला विनाशर्त support करतो. Ecological balance & environmental safety करीता मी काही सल्ला देत आहे. भारतात फक्त १५ % लोकसंख्या औद्योगिक क्षेत्रात राहते. Corona मुळे लोकं प्रभावित झाले आहे.Lifestyle व food habits मुळे लोकांचे आरोग्यावर वाईट परिणाम झाला आहे काही उद्योगामुळे प्रभाव पडतो परंतु सर्वांमळे नाही. १० km radius मधील health status चा data गोळा करा तसेच production status & ground water quality status गोळा करा.<br>Rain water Harvesting structure उभारण, पावसाचे पाणी साठवा जे उद्योगासाठी व पाणी पातळी उंचावण्यासाठी | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, या उद्योगामुळे रोजगार निर्मिती होईल. आजुबाजूच्या गावातील लोकांना रोजगार देण्यात येईल. कुशल व अकुशल व्यक्तींना रोजगार संधी देण्यात येईल. कामगारांच्या सुरक्षेकरिता आवश्यक ते सर्व उपाययोजना करण्यात येईल. १० कीमी. क्षेत्रातील मधील आरोग्य विषयक चा data गोळा करण्यात येईल व पुढे त्याचा अभ्यास करुन आरोग्य विषयक सुविधा पुरविण्यात येतील तसेच उत्पादनाबाबत व ground water quality status देखील गोळा करण्यात येईल. Rain water Harvesting structure उभारणे, पावसाचे पाणी साठवून उद्योगासाठी वापरणे (पाणी पातळी उंचावण्यासाठी). गावातील रस्त्यालगत वृक्षारोपण ज्यामध्ये फळांचे झाड व औषधीगुण असलेले झाडे लावणे, परिसरातील शिक्षित लोकांना नोकरीत प्राधान्य देणे, Skill development ला वाढविणे, इ. कामे या उद्योगाव्दारे करण्यात येतील.या उद्योगाव्दारे CSR अंतर्गत गावाच्या विकासाची कामे, आरोग्य शिबिर, |

| | | |
|---|---|---|
| | उपयुक्त आहे. गावात, रस्त्यालगत Plantation, Fruit Bearing and Medicinal Plants, परिसरातील शिक्षित लोकांना नोकरीत प्राधान्य. Skill development ला वाढवा. Co-ordination समिती बनवा कंपनीचे शासकीय व स्थानिक लोकं असतील. CSR अंतर्गत गावाचा विकास करणे. Health camp घेणे Ecological balance and environment safety ला प्राधान्य | Ecological balance and environment safety ला प्राधान्य देण्यात येईल. |

### ३) श्री. अय्युब खय्युम:-

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | मी सपोर्ट करतो. वायु, जल व ध्वनी प्रदुषण कमी करावे. लोकांना रोजगार दयावे स्थानिक औद्योगिक क्षेत्राला सपोर्ट करावा. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, १४० स्थानिक लोकांना या उद्योगात रोजगार देण्यात येईल या मध्ये कुशल व अकुशल व्यक्तींचा समावेश राहील. धुळीचे उर्तजन रोकण्यासाठी ESP हे प्रदुषण नियंत्रण संयंत्र व ५५ मी. उंचीची चिमणी लावण्यात येणार आहे. सांडपाण्यावर प्रक्रिया करण्याकरीता सांडपाणी प्रक्रिया संयंत्र बसविण्यात येईल. |

### ४) श्री. साधु व्यंकटेश्वरलु (नेता सेवा सोसायटी) पर्यावरणवादी:-

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १ | I support माझे suggestions: Health camp, शाळेतील मुलांना पुस्तक व बॅग्स्, गरिब विद्यार्थ्यांना सहारा विशेषत: प्रकल्प प्रभावित गावांना. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, या उद्योगाव्दारे CSR अंतर्गत गावाच्या विकासाची कामे, आरोग्य शिबिर, Ecological balance and environment safety ला प्राधान्य देण्यात येईल. तसेच शाळेतील |

| | | |
|---|---|---|
| | | विद्यार्थ्यांना पुस्तके, दप्तर व प्रोत्साहन पुरस्कार देण्यात येतील. |

## ५) श्री मंगेश पोटेवार टेकाडी, पर्यावरणवादी :-

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १ | १) MIDC मूळे बाधित शेतकरी. कोणते उत्पादन होणार. कोणता वायु निघणार, लोकांवर वाईट परिणाम होणार नाही याची लेखी हमी देणार का?<br>CSR फंड्स मधुन बाधित गावांसाठी काय उपाय करणार? MIDC तील आताचे उद्योगाची राख आमच्या शेतात पडते. प्रभावी उपाय योजनांची हमी न देता व येथील लोकांना विश्वासात न घेता प्रकल्प धुराचा परिणाम जंगलावर होईल. या प्रस्तावित कंपनीच्या धुरांमुळे जंगलावर, शेतीवर, आरोग्यावर वाईट परिणाम होणार नाही याची हमी उद्योगाने द्यावी. कंपनी कोणता वायु बाहेर फेकणार आहे? | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, आयर्न ओर चे बेनिफिकेशन करण्यात येईल. आयर्न ओर ला धुवून Pellet तयार करण्यात येतील. Pellet Plant मुख्य प्रस्ताव आहे. या उद्योगामुळे धुळ (Dust), SO२, NOx उत्सर्जित होईल. धुळीचे उसर्तजन रोकण्यासाठी ESP हे प्रदुषण नियंत्रण संयंत्र व ५५ मी. उंचीची चिमणी लावण्यात येईल. तसेच ॲश साठविण्या करिता सायलो बसविले जातील. उद्योग परीसरात पाण्याचे फवारे बसविले जातील. उद्योग परिसरातील वातावरणीय हवेची गुणवत्ता व धुरांडयातुन निघणाऱ्या वायुची गुणवत्ता नियमितपणे तपासण्यात येईल. परिसरातील गावांमध्ये नियमित आरोग्य शिबिरे आयोजित करण्यात येतील. CSR फंड्स मधुन गावातील विकास कामे करण्यात येतील. |
| | २) पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी ही कंपनी काय उपाय करणार? खर्च कसा करणार सांगा. | पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी अत्याधुनिक प्रदुषण नियंत्रण संयंत्र, ॲश सायलो, परिसरात पक्के रस्ते, परिसरात पाण्याचे फवारे बसविणे, उच्च दर्जाचे इंधन वापरणे, Rain water harvesting व वृक्ष लागवड कंपनीव्दारे करण्यात येईल. या करीता बजेटमध्ये तरतुद करण्यात येईल. कंपनी हरित पट्टा विकसीत करणार ज्यामुळे धुळ नियंत्रित करता येईल CSR व्दारे १८० |

| | | |
|---|---|---|
| | | लाख खर्च करणार. जनसुनावणी मधील सर्व प्रश्नावर सर्व उपाय व खर्च कंपनी करेल. १८० लाख चा खर्च आरोग्य, रस्ते बांधकाम, शांळांतील मुलभुत गरजा कंपनी पुर्ण करणार. सांडपाण्यावर प्रक्रया करण्याकरीता सांडपाणी प्रक्रीया संयंत्रणा बरविण्यात येईल व प्रक्रीया कृत सांडपाण्याचा पुर्नवापर करण्यात येईल. विटभट्टी धारकांना ॲश (राख) देण्यात येईल. |
| | ४) प्रत्येक कंपनी असे सांगते पण करत नाही. आमचे हे सांगणे शासकीय अधिका-यांना आहे. प्रभावित ५, ६ गावांतील कीती टक्के लोकांना रोजगार देणार? MIDC स्थापन करताना अनेक लोकांची शेती गेली अशा लोकांना ही कंपनी रोजगार देणार का? | १४० स्थानिक लोकांना या उद्योगात रोजगार देण्यात येईल या मध्ये कुशल व अकुशल व्यक्तींचा समावेश राहील. |
| | ५) कोणत्या प्रकारचे वायु प्रदुषण होणार? | या उद्योगामुळे धुळ (Dust), SO२, NOx उत्सर्जीत होईल. धुळीचे उस्र्तजन रोकण्यासाठी ESP हे प्रदुषण नियंत्रण संयंत्र व ५५ मी. उंचीची चिमणी लावण्यात येईल. तसेच ॲश साठविण्या करिता सायलो बसविले जातील. उद्योग परीसरात पाण्याचे फवारे बसविले जातील. |
| | ६) जवळपासच्या गावातील कीती लोकांना रोजगार दिला जाणार? प्रकाल्पामध्ये ज्या लोकांची जमीन जाणार त्यांना रोजगार मिळणार का? | १४० स्थानिक लोकांना या उद्योगात रोजगार देण्यात येईल या मध्ये कुशल व अकुशल व्यक्तींचा समावेश राहील. प्रकाल्पामध्ये ज्या लोकांची जमीन जाणार त्यांना रोजगार देण्यात येईल. |

| | | |
|---|---|---|
| | | समन्वयक यांनी सांगितले की, सदर उद्योगास नियमाच्या अधिन राहून मप्रनि मंडळाव्दारे अटी व शर्ती युक्त C२E संमतीपत्र देण्यात येईल. तसेच नियमाच्या अधिन राहून व प्रदुषण नियंत्रण उपकरण/यंत्रणा उद्योगाने बसविल्यानंतर मंडळाव्दारे अटी व शर्ती युक्त C२O संमतीपत्र देण्यात येईल. |

६) **श्री. गौरव गोपीचंद शामकुळे :-**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १ | प्रकल्पामुळे प्रदुषण होणार यावर उपाय करावा प्रभावित गावातील ७५% लोकांना रोजगार द्यावा. ठेकेदारांना विनेती करुन सुध्दा रोजगार मिळत नाही. गावात मुलं BA, MA झाले आहेत. कंपनीने रोजगाराबाबत करार करुन द्यावा. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, प्रभावित गावातील लोकांना या उद्योगात रोजगार देण्यात येईल. |

७) **श्री. मनीष रक्षमवार, मुल :-**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १ | नवीन कंपन्या येतात हे चांगले आहे. स्थानिकांना रोजगार द्यावा. येथील Rajuri Steel मध्ये २०० पैकी १९० स्थानिक लोकांना रोजगार दिला आहे. याला लागुन २० एकर पट्टा मिळाला तर विस्तार करुन स्थानिक लोकांना रोजगार देऊ. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, प्रभावित गावातील लोकांना या उद्योगात रोजगार देण्यात येईल. १४० स्थानिक लोकांना या उद्योगात रोजगार देण्यात येईल या मध्ये कुशल व अकुशल व्यक्तींचा समावेश राहील. प्रकाल्पामध्ये ज्या लोकांची जमीन जाणार त्यांना रोजगार देण्यात येईल. |

पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणी समितीचे अध्यक्ष यांनी उपस्थित असलेल्या नागरीकांना आणखी काही प्रश्न/आक्षेप/सूचना असतील तर विचारण्याचे आव्हान केले. मात्र कोणीही तद्नंतर प्रश्न/सूचना/आक्षेप उपस्थित केले नाहीत. त्यानंतर सदस्य पर्यावरण जाहीर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, बैठकीत करण्यात आलेल्या सूचना, आक्षेपांची नोंद घेण्यात आली असून त्याचे ईतिवृत्त व रेकॉर्डींग जनतेकरिता प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि. मंडळ, पहिला माळा, उद्योग भवन, रेल्वे स्टेशन रोड, चंद्रपूर येथे थोड्या दिवसात उपलब्ध करून देण्यात येईल.

अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणी समिती यांनी बैठकीचा समारोप करताना जनसुनावणीतील उपस्थित झालेल्याबाबींचा आढावा घेऊन उपस्थितांचे आभार मानून जाहीर जनसुनावणी संपल्याचे जाहीर केले.

| | | |
|---|---|---|
| **(उमाशंकर भ. भादुले)**<br>समन्वयक, पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणी समिती तथा प्रभारी उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, चंद्रपूर | **(अ. मा. करे)**<br>सदस्य, पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणी समिती तथा प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, चंद्रपूर | **(विशालकुमार मेश्राम)**<br>अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणी समिती तथा अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी, चंद्रपूर |